मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २९५ वा ● शुक्रवार, ता.२५ एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

श्री विठ्ठल मंदिर ऑफ नामदेव शिंपी समाज आयोजित

श्री सकल संत नामसंकीर्तन, भागवत धर्मचिंतनी, वारकरी समाज संस्कृती सप्ताह सोहळा

बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ ते बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ (अक्षयतृतीया)

गुरुवार, २४ एप्रिल २०२५ रोजी प्रवचन सेवा

ह.भ.प. भारत महाराज कैकाडी (जाधव) (पंढरपूर)



- सुप्रसिद्ध कीर्तनकार
- रामदास महाराज कैकाडी मठाचे उत्तराधिकारी.
- वारकरी संप्रदायातील विचारवंत तथा अभ्यासक.
- संत विचारपीठ पंढरपुरचे अध्यक्ष.

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code

रयत समाचार चॅनल
Scan QR Code

इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

## विसंवाद हे कौटुंबिक ऱ्हासाचे कारण- ॲड. फणसळकर

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**



वेगवेगळ्या प्रकारचे विसंवाद हे कौटुंबिक ऱ्हासाचे कारण आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधिज्ञ आणि मानसोपचारतज्ज्ञ ॲड. अनिशा फणसळकर यांनी चापेकर स्मारक उद्यान, चापेकर चौक, चिंचवडगाव येथे बुधवार, ता.२३ एप्रिल २०२५ रोजी केले. गांधीपेठ तालीम मित्रमंडळ आयोजित पाच दिवसीय जिजाऊ व्याख्यानमालेत कुटुंबव्यवस्थेच्या ऱ्हासाची कारणे आणि उपाय, पण याला जबाबदार कोण? या विषयावरील प्रथम पुष्प गुंफताना ॲड. अनिशा फणसळकर बोलत होत्या. पिंपरी - चिंचवड महापालिका सहआयुक्त चंद्रकांत इंदलकर, माजी नगरसेवक सुरेश भोईर, साहित्यिक श्रीकांत चौगुले, गांधीपेठ तालीम मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, उपाध्यक्ष ॲड. विपुल नेवाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून व्याख्यानमालेचा प्रारंभ करण्यात आला. चंद्रकांत इंदलकर यांनी, शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये, ही म्हण खरी आहे. प्रशासकीय सेवेत मी त्याचा अनेकदा अनुभव घेतला आहे. गांधीपेठ तालीम मित्रमंडळाच्या प्रारंभीच्या काळात एक सामान्य कार्यकर्ता म्हणून मी त्यांच्या उपक्रमांशी जोडलो गेलो होतो! अशी भावना व्यक्त केली. राजाभाऊ गोलांडे यांनी प्रास्ताविकातून, जिजाऊ व्याख्यानमालेच्या माध्यमातून चौतीस वर्षांपासून महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या विषयांवर समाजप्रबोधन केले आहे; तर अत्याधुनिक व्यायामशाळेमुळे असंख्य तरुणांचे बलसंवर्धन घडले आहे! अशी माहिती दिली.

ॲड. अनिशा फणसळकर पुढे म्हणाल्या की, एकत्र कुटुंबव्यवस्था ही आपली संस्कृती आता लोप पावत चालली आहे; तसेच छोट्या कुटुंबातही कलह आणि वाद यामुळे घटस्फोटांचे प्रमाण वाढत चालले आहे. भौतिक गोष्टीत सुख शोधण्याच्या वृत्तीमुळे आपण समाधान हरवत चाललो आहोत. रियल लाईफ अन् रील लाईफ यातील सीमारेषा आपण पुसून टाकल्या आहेत; आणि मोबाइलसारख्या उपकरणात आपण गुरफटत चाललो आहोत. समोरासमोर बसून मनमोकळ्या गप्पा मारणे विसरून ऑनलाइनच्या आभासी जगात आपण जास्त रमतो. आपली बेगडी प्रतिमा समाजापुढे दाखविण्याचा आपला प्रयत्न असतो. बदलेली जीवनशैली, समजूतदारपणाचा अभाव, अहंभाव, नकार न पचविण्याची मानसिकता, व्यसनाधीनता, तुलना आणि दुसऱ्याशी स्पर्धा करण्याची वृत्ती, तडजोडीचा अभाव, नैराश्य अशा वैगुण्यांमुळे वैवाहिक जीवनात विसंवाद वाढले असून त्याची परिणती संबंधविच्छेदनात होत आहे. त्यामुळे विवाहपूर्व समुपदेशन खूप महत्त्वाचे आहे. आपण स्वतः, कुटुंब आणि समाज या दुर्दशेला जबाबदार आहोत. मन मोकळे करता येईल असा एकही मित्र नसणे ही सामाजिक शोकांतिका झाली आहे. स्वसंवादाअभावी विस्मरण अर्थात अल्झायमर्स या विकाराचा प्रादुर्भाव जागतिक स्तरावर वाढतो आहे. यासाठी स्वसंवाद आणि परस्पर संवाद खूप गरजेचा आहे. छंद जोपासणे, वय विसरून लहान मुलांमध्ये रमणे अशा उपायांनी यावर मात करता येईल! व्याख्यानादरम्यान विद्युत पुरवठा खंडित झाला तरी श्रोते शांतपणे जागेवर बसून होते. त्यामुळे फणसळकर यांनी श्रोत्यांमध्ये येऊन संवाद साधला; तसेच विविध किस्से आणि उदाहरणे उद्धृत करीत श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. महेश गावडे, सचिन डोंगरे, बाळासाहेब कुंभार, नितीन हिरवे यांनी संयोजनात सहकार्य केले. कैलास गावडे यांनी सूत्रसंचालन केले. सुहास पोफळे यांनी आभार मानले.



## महिला दक्षता समितीच्या उपसमित्या स्थापन करा- डॉ. गोऱ्हे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात पोलीस ठाण्याच्या अखत्यारितील निवासी गृहांवर लक्ष ठेवण्यासाठी महिला दक्षता समितीच्या उपसमित्या स्थापन कराव्यात. अशा समित्यांद्वारे संबंधित बालगृहांवर सातत्याने लक्ष ठेऊन छेडछाड, मारहाण किंवा अन्य तक्रारींची तत्काळ दखल घ्यावी. अनधिकृत संस्थांची ओळख पटवण्यासाठी समाजकल्याण, आदिवासी विकास, शिक्षण विभाग आदींच्या कागदपत्रांचे एकत्रिकरण करून 'डिस्ट्रिक्ट मॅपिंग' करणे आवश्यक असल्याचे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

खडवली ता. कल्याण, जि. ठाणे येथील अनधिकृत खासगी बालगृहात ११ एप्रिल २०२५ रोजी उघडकीस आलेल्या अत्याचारप्रकरणी विधानपरिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन येथे विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी महिला व बाल विकास विभागाचे अवर सचिव प्रसाद कुलकर्णी, उपायुक्त सुवर्णा पवार तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, तपास अधिकारी सुरेश कदम, अपर जिल्हाधिकारी हरिशचंद पाटील, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी संजय भोसले, सहआयुक्त राहूल मोरे उपस्थित होते.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

## लेखक, कवी श्रीरंजन आवटे यांचे ११ प्रश्न

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांना ११ प्रश्नः १. जम्मू आणि काश्मीर सध्या केंद्रशासित प्रदेश असून कायदा व सुव्यवस्था ही केंद्राची पर्यायाने गृह खात्याची जबाबदारी आहे. ही जबाबदरी आपण मान्य करता का?, २. दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षारक्षक/ पोलीस उपस्थित का नव्हता?, ३. पहलगाम हे भारत पाकिस्तान सीमारेषेच्या आत शेकडो किलोमीटर दूर असताना आणि अर्धा तास गोळीबार झालेला असताना अतिरेकी सही सलामत कसे परतले?, ४. सुरक्षा सैन्य सुमारे १ लाख ८० हजाराने कमी केले आहे काय? इतकी प्रचंड कपात करण्याचे कारण काय आहे? हा सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार नव्हे काय?, ५. मा. पंतप्रधान महोदयांचा पाच दिवसांपूर्वीचा काश्मीर दौरा रद्द का झाला? या अनुषंगाने गुप्तचर विभागाला काही कल्पना होती का? अशी कल्पना असतानाही सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात अक्षम्य चूक कशी झाली? काही दिवसांनी काश्मीरमध्ये काही भयंकर घडणार आहे, हे आधीच काहींनी सोशल मिडियावर लिहिले होते. याबाबत सरकारला कल्पना नसणे अशक्य आहे, ६. सहा वर्षांपूर्वी पुलवामा येथील हल्ला कसा झाला? या हल्ल्यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला. हा हल्ला कोणी केला? या प्रश्नांची उत्तरे देण्यात सरकार पूर्णतः अपयशी ठरले आहे, ७. सुमारे ४५० किलो हल्ल्याच्या ठिकाणी कसे आले?, ८. सैनिकांनी एअरलिफ्ट करण्याची मदत मागितलेली असतानाही त्यांना ती मदत का गेली नाही?, ९. तत्कालीन राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी हा हल्ला सरकारनेच घडवून आणला, असे अत्यंत गंभीर आरोप केले. त्यावर कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण सरकारला का देता आले नाही?, १०. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ बिपीन रावत यांचा २०२१ मध्ये अपघाती मृत्यू 'ह्युमन एरर' मुळे झाला, असा अहवाल देण्यात आला. या अनुषंगाने नेमकी काय कारवाई करण्यात आली?, ११. निशिकांत दुबेंपासून ते छत्तीसगड भाजप हँडलपर्यंत, ते इतर अनेक नेत्यांची विधाने मुस्लिम विरोधी वातावरण निर्मिती करणारी आहेत. काही अँकर्सनी सर्वोच्च न्यायालयाला लक्ष्य केले आहे. या अनुषंगाने भाजपची अधिकृत भूमिका काय आहे?



श्रीरंजन आवट

------

धर्मसंवाद

## कोर्ट प्रॅक्टिशनर बार असोसिएशन अध्यक्षपदी घावटे तर उपाध्यक्षपदी गडाख

**नेवासा । शफीक बागवान**





येथील जिल्हा कोर्ट प्रॅक्टिशनर बार असोसिएशनच्या दोन वर्षाकरिता जाहीर झालेल्या निवडणुकीत दोन्ही गटाने सामोपचार घडवून आणत एक-एक वर्षाचा कार्यकाळ ठरवून घेतला आहे. सन २०२५-२६ वर्षासाठी अंमळनेर येथील ॲड. लक्ष्मण ज्ञानदेव घावटे अध्यक्षपदी, तर सोनईचे ॲड सुनील भाऊसाहेब गडाख यांच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. भरत वर्मा व ॲड पांडुरंग औताडे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया करण्यात आली होती. अध्यक्षपदासाठी चार अर्ज दाखल झाले होते. निवडणूक बिनविरोध करीता ज्येष्ठ विधिज्ञ एम. बी. कर्डक, एन. व्ही. लोंढे, ॲड. लक्ष्मण घावटे, अध्यक्ष ॲड. सुनील गडाख, उपाध्यक्ष शिंदे, बी. एस. गरड यांनी प्रयत्न केले. महिला उपाध्यक्ष म्हणून ॲड. सोनल मयूर वाखुरे, सचिव म्हणून ॲड. तुषार शिंदे, खजिनदार ॲड. सतीश पवार, तर विश्वस्त म्हणून ॲड के. बी. शिंदे, के. बी. नवले, टी. एस. पवार व संदीप कोतकर यांची निवड जाहीर करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## सामंजस्य करार :आता मेटा येणार राज्यशासनाच्या मदतीला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या विविध सेवा व्हॉट्सअपवर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने मेटासोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीची संपूर्ण प्रणाली व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. आरोग्यविषयक सर्व योजनांसाठी एकच पोर्टल आणि अर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधीबाबत सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून नागरिकांना सहज उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री सहायता निधीसंदर्भात आयोजित बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक आदी उपस्थित होते.

## तरुणांना प्रेरणादायी यश- दीपक मेहेत्रे

### ओंकार झाला आयआरएस; निंबळक येथे आनंदोत्सव



**अहमदनगर । दिपक शिरसाठ**


घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना केवळ जिद्द व चिकाटीने सातत्यपूर्ण प्रयत्न केल्याने यूपीएससी परीक्षेत ओंकार खुंटाळे याने यश मिळविले. जिल्हा परिषदेच्या शाळेत व ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन देखील भरीव यश संपादन करता येते, हे त्याने दाखवून दिले. त्याचे हे यश तरुणांना प्रेरणा देणारे आहे, असे मत एकात्मिक बाल विकास सेवा योजना,अहमदनगर प्रकल्पाधिकारी दीपक मेहेत्रे यांनी व्यक्त केले. तालुक्यातील निंबळक येथील ओंकार मीनाक्षी राजेंद्र खुंटाळे याने यूपीएससी परीक्षेत ६७३ वा क्रमांक मिळवला. त्यामुळे गावकऱ्यांनी भव्य स्वागत मिरवणूक आणि नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव कोतकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी सरपंच प्रियंका लामखडे, माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार, उपसरपंच बाळासाहेब कोतकर, उद्योजक अजय लामखडे, युवानचे संदीप कुसाळकर, सचिन चोभे, राजेंद्र कोतकर, चेअरमन भाऊराव गायकवाड, माधवराव कोतकर, घोटण देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजी गोसावी, किसनबाबा कोतकर, अविनाश आळंदीकर, सोमनाथ खांदवे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी भव्य अशी मिरवणूक, फटाक्यांची आतिषबाजी, गुलालाची उधळण करून ओंकारच्या यशाचा आनंदोत्सव साजरा केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भानुदास कोतकर यांनी केले तर सूत्रसंचालन सुनील जाजगे यांनी केले. तर महादेव गवळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ज्ञानेश्वर डहाळे, अविनाश व्यवहारे, कमलेश कोळपकर, सचिन औटी यांसह निंबळक ग्रामस्थांनी प्रयत्न केले. ओंकारच्या यशाबद्दल खासदार निलेश लंके, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे, उद्योजक शरद ठाणगे, बाळासाहेब कोतकर, बी.डी. कोतकर, सचिन कोतकर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ओंकारची आई मीनाक्षी या अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत आहेत. वृत्तपत्रातून बातमी समजताच सत्कार सोहळ्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना नगर प्रकल्पाचे प्रकल्पाधिकारी दीपक मेहेत्रे आवर्जून उपस्थित राहिले.

**हा अविस्मरणीय क्षण : ओंकार खुंटाळे**

**गेल्या सात वर्षांपासून मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होतो. अनेकदा यशाने हुलकावणी दिली. मागच्या प्रयत्नात अगदी थोड्या फरकाने माझ्या पदरी अपयश आले होते. मात्र, हे अपयश अंतिम नाही, असे स्वतःला सांगून, अगदी कमी वेळेत पुढील परीक्षेची तयारी केली. अंतिमतः यावेळी यश मिळाले. माझ्या जन्मभूमीत झालेले स्वागत आणि सत्कार हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असणार आहे, असे सत्काराला उत्तर देताना ओंकार खुंटाळे म्हणाले.**

## सगळेच सत्ताधारी स्वातंत्र्याचे मारेकरी १८ जून- काळा दिवस



**अमर हबीब**
आंबाजोगाई, महाराष्ट्र
८४११९०९९०९

समाजसंवाद

नकाशात आज दिसतो तसा संपूर्ण भारत देश इंग्रज येण्याआधी कधीच नव्हता. इंग्रजांच्या काळात पहिल्यांदा सर्वांसाठी सारखा भारतीय दंड संहिता हा कायदा अस्तित्वात आला. इंग्रज गेल्यानंतर पाहिले संविधान आले. इंग्रज गेले तेंव्हा भारतात चार दोन नव्हे, पाच शे हुन अधिक संस्थाने होती. त्यांचा कारभार, मनमर्जी चालायचा. राजाचा आदेश हाच कायदा असायचा! ही मोठी अनागोंदी भारतीय संविधानाने संपवली. एकत्र राहण्याची देश भावना, म. गांधींनी निर्माण केली. संविधानाने देशाचा राज्यकारभार सुसूत्र चालावा यासाठी रचना केली व भारतीय नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार (स्वातंत्र्य) सुरक्षित राहील याची हमी दिली! मी ही मोठी ऐतिहासिक घटना मानतो. मी मानतो की भारताच्या मूळ संविधानात शेतकऱ्यांबाबत पक्षपात नव्हता. सर्वांना समान मानले होते. दुर्दैवाने संविधान लागू झाल्यानंतर अवघ्या दीडच वर्षांनी मूलभूत अधिकारांना सुरक्षित करणाऱ्या या संविधानात पहिली घटना दुरुस्ती करून शेतकऱ्यांचे मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले. अनुच्छेद ३१ ए व बी मध्ये बदल करण्यात आला. त्यातून मूळ संविधानात नसलेले परिशिष्ट नऊ निर्माण करण्यात आले.

या परिशिष्टात जे कायदे टाकले जातील त्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही, अशी तजवीज केली. एवढेच नव्हे तर मूलभूत अधिकारांचे हनन होत असले तरी न्यायालय त्याबद्दल भाष्य/हस्तक्षेप करू शकणार नाही, अशी तरतूद केली. या घटनादुरुस्तीचा (दुरुस्ती कसली हा ते बिघाड होता) मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. सीलिंग, आवश्यक वस्तू हे शेतकऱ्यांना गुलाम करणारे कायदे केवळ परिशिष्ट ९ मुळे कायम राहिले. आज या परिशिष्टात २८४ कायदे आहेत, त्यापैकी अडीच शे कायदे केवळ शेती आणि शेतकऱ्यांशी निगडित आहेत. परिशिष्ट ९ ने देशाची भारत आणि इंडिया अशी फाळणी केली.

त्यानाबतर आलेल्या कायद्यानी शेतकऱ्यांना आत्महत्या करायला भाग पाडले. पाच लाखाहून अधिक शेतकऱ्यांना मरण बोलावून घ्यावे लागले. अनुच्छेद १३ हे मूलभूत अधिकारांचे सुरक्षा कवच होते. आमच्या घटनाकारांनी ते आवर्जून घटनेत समाविष्ट केले होते. आणीबाणीच्या काळात त्यात दीड ओळीची घटना दुरुस्ती करण्यात आली व ३६८ (घटना दुरुस्तीचे अनुच्छेद) द्वारा केलेल्या घटनादुरुस्तीला वरील बंधन लागू राहणार नाही, अशी दुरुस्ती करून हे अनुच्छेदही निष्प्रभ करण्यात आले. डावे-उजवे मिळून जे जनता सरकार आले होते, त्यांनी आणीबानीतील इतर काही घटनादुरुस्त्या रद्द केल्या, पण ही रद्द केली नाही. डावे असो की उजवे, सगळे राजकीय पक्ष हे शेतकऱ्यांचे मारेकरी आहेत. देशाच्या नागरिकांच्या स्वातंत्र्याला नख लावणारे आहेत. इतर कोणापेक्षा सर्जकांना स्वातंत्र्याचे मोल जास्त असते. स्वातंत्र्याचा संकोच सर्जकांना उध्वस्त करून टाकतो. म्हणून माझ्यासारखा माणूस या मुद्द्याला घेऊन अस्वस्थ होतो. तुम्ही अस्वस्थ असाल तर १८ जून हा दिवस काळा दिवस म्हणून आपण पाळू. मी त्याला शेतकरी पारतंत्र्य दिवस असे नाव दिले आहे. या देशातील नागरिकांचे गेलेले गुलभुत अधिकार पुन्हा प्रस्थापित करण्याचा संकल्प करू.

# निमगाव यात्रेत थरारक कुस्त्यांचा रंगला आखाडा

## मानाच्या कुस्त्यांत मल्लांनी पटकाविली चांदीची गदा व रोख बक्षीस

**नगरतालुका । प्रतिनिधी**

निमगाव वाघा येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त बुधवारी ता.२३ एप्रिल रोजी कुस्तीचे मैदान लाल मातीच्या आखाड्यातील थरारक कुस्त्यांनी रंगले होते. हलगी-डफाचा निनाद, बजरंग बलीचा जयघोष, आखाड्या भोवती जमलेल्या पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात युवा मल्लांच्या कुस्त्या पार पडल्या. मैदानात झालेल्या चितपट कुस्त्यांनी ग्रामस्थांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. उपसरपंच केसरी या मानाच्या तीन कुस्त्या लावण्यात आल्या. यामध्ये पै. संदिप डोंगरे, पै. महेश शेळके व पै. सौरभ शिंदे यांनी चितपट कुस्त्या करुन चांदीच्या गदा व रोख रकमेचे बक्षीस पटकाविले. मल्लांच्या डाव-प्रतिडावाने आखाडा रंगला होता. उपसरपंच किरण जाधव यांच्या वतीने मानाच्या तीन रंगतदार कुस्त्या लावण्यात आल्या होत्या. यामध्ये पै. संदिप डोंगरे (निमगाव वाघा) विरुध्द पै. अक्षय वाडितके (लोणी बुद्रुक) यांच्यात झालेल्या कुस्तीत संदिप डोंगरे याने एकेरी पट काढून समोरच्या मल्लास आसमान दाखवून विजय संपादन केले.



पै. महेश शेळके (निमगाव वाघा) विरुध्द पै. राहुल काकडे यांच्यातील कुस्तीत पै. महेश शेळके याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन पाच ते सात मिनीटात प्रतिस्पर्धी मल्लाला चितपट केले. तर पै. अभिषेक मळेकर (अमरावती) विरुध्द पै. सौरभ शिंदे (पिंपळगाव वाघा) यांच्यात झालेल्या कुस्तीत सौरभ शिंदे मानेवर कस काढून कुस्ती अवघ्या मिनीटात चितपट केली. या तिन्ही विजयी मल्लांना चांदीची गदा व रोख रकमेचे बक्षीस देण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील अनेक युवा व दिग्गज मल्लांसह महिला कुस्तीपटूंनी हजेरी लावली होती. रंगलेल्या कुस्त्यांमध्ये विजयी व उपविजयी मल्लांना बक्षीसे देण्यात आली. आकाश डोंगरे याची कुस्ती प्रेक्षणीय ठरली. महाराष्ट्र चॅम्पीयन पै. अनिल ब्राम्हणे यांनी देखील आखाड्यात हजेरी लावली होती. कुस्ती क्षेत्रातील वस्ताद मंडळींचा ग्रामस्थांच्या वतीने रोख रकम देवून सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी उद्योजक अरुण फलके, उपसरपंच किरण जाधव, नगर तालुका तालिम संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, खरेदी विक्री संघाचे संचालक भरत फलके, नामदेव भुसारे, पीएसआय छगन कापसे, पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र डोंगरे, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब जाधव, संचालक अतुल फलके, अनिल डोंगरे, बाबा केदार, अरुण कापसे, भानुदास ठोकळ, भरत बोडखे, सुनिल जाधव, वैभव फलके, पै. पोपट शिंदे, अजय फलके, ऋषी जाधव, उद्योजक रामदास डोंगरे, ज्ञानदेव कापसे, मच्छिंद्र काळे, मयुर काळे, बबन शेळके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. गावातील यात्रेनिमित्त मंगळवारी ता.२२ एप्रिल रोजी युवकांनी कावडीने आणलेल्या गंगाजलची गावात पारंपारिक वाद्याच्या गजरात मिरवणुक पार पडली. या मिरवणुकीत संगीताच्या तालावर नृत्य करणारे अश्व मिरवणुकीचे आकर्षण ठरले. सुरेश जाधव यांनी शिवकालीन युध्दकलेचे धाडसी प्रात्यक्षिक दाखवले. श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा करण्यात आली. यात्रोत्सवानिमित्त मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. रात्री छबीना मिरवणूक पार पडून नर्गिस पुणेकर यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम रंगला होता. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस उत्साहात पार पडला. निघालेल्या मिरवणुकीत गावात धार्मिक एकतेचे दर्शन घडले. करिमशहा वली बाबांच्या दर्ग्यात दर्शनासाठी देखील भाविकांनी गर्दी केली होती. संदल उरुस यशस्वी करण्यासाठी राजू शेख, दिलावर शेख यांनी परिश्रम घेतले.



# भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**अहमदनगर । प्रतिनिधी**

काश्मीरखोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन परिसरात झालेल्या अमानवी व भ्याड दहशतवादी हल्ल्याचा घर घर लंगर सेवेच्या वतीने निषेध करण्यात आला. या हल्ल्यात बळी पडलेल्या २६ निरपराध नागरिकांना तारकपूर येथील अन्न छत्रालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या श्रद्धांजली कार्यक्रमात जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, राजेंद्र कंत्रोड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सनी वधवा, सोमनाथ चिंतामणी, सुनिल थोरात, कैलाश नवलानी, डॉ. संजय असनानी आदी उपस्थित होते. उपस्थितांनी दहशतवादाचा जोरदार निषेध व्यक्त करुन भारत सरकारने याविरोधात ठोस पावले उचलण्याची मागणी केली. जनक आहुजा म्हणाले की, काश्मीरमध्ये निष्पाप नागरिकांवर अमानुषपणे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांनी संपूर्ण मानवजातीवरच आघात केला आहे. पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताच्या अखंडतेवर घाला घालत आहेत. हा हल्ला म्हणजे मानवतेवर झालेला घात आहे. भारत सरकारने आता यापुढे शांत राहू नये आणि कठोर भूमिका घेण्याचे त्यांनी स्पष्ट केले. हरजितसिंह वधवा म्हणाले की, दहशतवाद्यांच्या या कायर कृतींना आता तोंड द्यावे लागेल. धर्माच्या नावावर अशा प्रकारचे हिंसाचार घडवणे ही मानवतेची विटंबना आहे. काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता माजवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. भारताने आता ठोस आणि निर्णायक धोरण स्वीकारण्याची वेळ आली असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.

# भगवान महावीर चषक स्पर्धा ही नगरकरांसाठी आनंदाची पर्वणी- चोपडा

## पहलगाम मृतकांना महावीर चषक परिवाराच्या वतीने श्रद्धांजली

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील वाडिया पार्क मैदानावर भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने गेल्या १६ वर्षांपासून सुरु असलेल्या महावीर कप २०२५ च्या विविध क्रीडा स्पर्धेला उत्साहात प्रारंभ झाला असून या स्पर्धा २३ एप्रिल ते ४ मे दरम्यान चालणार आहे यामध्ये आयपीएलच्या धर्तीवर डे नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा थरार रंगणार असून १६ संघांनी सहभाग घेतला आहे, त्याचबरोबर रस्सीखेच, बॅडमिंटन, रिले धावणे स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली असून नगरकर स्पर्धा पाण्यासाठी मोठी गर्दी करत असून खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम करत आहे, अक्षरश: वाडिया पार्कमध्ये आनंदाचे उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले पाहावयास मिळत आहे, तसेच खेळाडूंमध्ये एकोपा निर्माण होत आहे, भगवान महावीर कप स्पर्धाही नगरकरांसाठी आनंदाची पर्वणी ठरत आहे असे मत मा.नगरसेवक संजय चोपडा यांनी व्यक्त केले या स्पर्धेसाठी शांतीकुमारजी मेमोरियल फाउंडेशन, मर्चंट बँक, इलाईट कॉर्पोरेशन, मनोज छाजेड, अरिहंत बिझनेस सेंटर, महावीर



ग्रुपचे राजेश भंडारी, ऐ.पी (इन्क्रोप) चे अशिष पोखरणा, जयकुमार मुनोत, नरेंद्र बाफना, वर्षा इंडस्ट्रीज, अतुल पारख, कॅमल साबुदाणा, अभय भंडारी आदींचे सहकार्य लाभत आहे. दरम्यान स्पर्धे च्या सुरुवातील जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या पाकिस्तानी अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यात पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्या असून या मृतकांना भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आदर्श व्यापारी मित्र मंडळाचे संस्थापक माजी नगरसेवक संजय चोपडा, अध्यक्ष राजेंद्र तातेड, राजेंद्र गांधी, अतुल शेटीया, अजय गुगळे, डॉ. सचिन बोरा, अमित पितळे, लक्ष्मीकांत शेटिया, प्रीतम गुंदेचा, उमेश मंत्री, निलेश मंत्री, आनंद पितळे, वर्धमान मुनोत, राहुल शिंदे, राहुल शेटिया, अभी कोके, सुयोग लुनिया, मयूर पितळे, सी.ए आनंद गांधी, प्रीतम पोखरणा, आनंद कटारिया, रुपेश कटारिया, रुपेश भंडारी, सचिन कटारिया, रितेश बोरा, आनंद नाहाटा, अनिल दुग्गड, बापू गांधी, वर्धमान मुनोत, किरण पोखरणा, पावन पोखरणा, निखील गुगळे, सचिन कटारिया, प्रफुल्ल मुथा, विकास सुराणा, प्रवीण शिंगवी, अजय कांबळे आदी परिश्रम घेत आहे. राजेंद्र गांधी म्हणाले की, धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्य आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असतात. मात्र भगवान महावीर कप स्पर्धेच्या माध्यमातून युवकांमध्ये खेळाची गोडी निर्माण होत असून व्यायामाकडे आकर्षित केले जाते. त्यामुळे आपले आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होते, आदर्श व्यापारी मित्र मंडळ व मॉर्निंग क्रिकेट क्लब चे युवक एकत्रित येत शहरात भगवान महावीर कप स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जाते. या माध्यमातून खेळाडू आपल्या खेळाचे प्रदर्शन करत असतात.



# अहमदनगर महाविद्यालयात शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी विशेष परिसंवाद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

डॉ. बी. पी. हिवाळे शिक्षण संस्थेचे अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी एका विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादासाठी प्रा. डॉ. प्रीतमकुमार बेदरकर (उपप्राचार्य व मानसशास्त्र विभाग प्रमुख अहमदनगर महाविद्यालय) व डॉ. शीतल शिंदे (आहारतज्ज्ञ - बूथ हॉस्पिटल) यांना प्रमुख वक्ते म्हणून बोलावण्यात आले होते. सर्वप्रथम पाहुण्यांचा परिचय प्रा. संतोष कांबळे व डॉ. रूपाली नाथ यांनी करून दिला. याप्रसंगी पाहुण्यांचा सत्कार उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे व पर्यवेक्षिका उज्वला गायकवाड यांनी केला. यानंतर उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांनी परिसंवादाचा उद्देश सांगत असताना विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये यश संपादन करताना अभ्यासाबरोबरच शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची असणारी आवश्यकता याबद्दल आपले विचार मांडले. प्रा. डॉ. प्रीतमकुमार बेदरकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जीवनातील आदर्श माने कोणती असावीत, स्व ओळख निर्मिती कशी करावी, आलेल्या संधीचे सोने कसे करावे, आयुष्यात निर्माण होणाऱ्या ताणावर कशी मात करावी, संकटाच्या वेळी मानसिक स्वास्थ्य कसे राखता येईल अशा अनेक विषयांवर विदयार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. शितल शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना समतोल आहाराची आवश्यकता, निद्रेचे महत्व, अपुऱ्या झोपेमुळे होणारे शारीरिक दुष्परिणाम, व्यायामाची आवश्यकता, किशोरावस्थेतील लसीकरण, प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना अशा अनेक विषयांवर सविस्तर चर्चा केली. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष कांबळे यांनी केले. तर प्रा. केतन औटी यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली

**अहमदनगर । प्रतिनिधी**

काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याचा कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने निषेध करण्यात आला. या भ्याड हल्ल्यात बळी पडलेल्या निरपराध नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कौटुंबिक न्यायालयात झालेल्या श्रध्दांजली कार्यक्रमाप्रसंगी कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीशसंगीता ना. भालेराव, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे, उपाध्यक्ष तथा विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, सचिव ॲड. राजेश कावरे, ॲड. शिवाजी कराळे, प्रबंधक एस.के. मोहोळकर, सहाय्यक अधीक्षक ए. आय. शेख, कर्मचारी एस.के. चव्हाण, ए.पी. झिंजे, आर.एस. गुंडू, ए.एस. तगारे, आर.ए. मोरे, एस.बी. आळकुटे, एल.एस. जाधव, एस.के. जाधव आदी उपस्थित होते. यावेळी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. उपस्थितांनी या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवून दहशतवादी संघटनांना चोख उत्तर देण्याची मागणी केली.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# सार्वभौमत्वावर हल्ला !



काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते.

पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# कोपरगाव तालुक्यात आता महिलाराज

**कोपरगाव । किसन पवार**

तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतीच्या पुढील पाच वर्षासाठीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी जाहीर केल्याप्रमाणे कोपरगाव तहसील कार्यालयास संपन्न झाला असून त्यात एकूण ७५ ग्रामपंचायती पैकी ३८ ग्रामपंचायतीत महिला आरक्षण जाहीर केले आहे. कोपरगाव तालुक्यातील ३८ ठिकाणी महिलाराज असणार असल्याचे उघड झाले असून त्यात पुढील गावे आणि महिला सरपंच आरक्षण दर्शवले आहे. अनुसूचित जातीच्या १० गावांचे आरक्षण असून त्यात ०५ महिलांचे आरक्षण आहे त्यात कोळगाव थडी,अंचलगाव,मुर्शतपुर,धोत्रे व घारी यांचा समावेश आहे.तर अन्य अनुसूचित जाती पुरुषांसाठी ०५ ग्रामपंचायतीआहे त्यात कोळपेवाडी,आपेगाव,पढेगाव,तळेगाव मळे,सोनेवाडी आदींचा समावेश आहे. तर अनुसूचित जमातीत १६ ग्रामपंचायती आरक्षित असून त्यात ०८ महिला तर ०८ पुरुष आहे.त्या पुढील प्रमाणे आहे -प्रथम महिला आरक्षण खिर्डि गणेश, नाटेगाव, भोजडे, शिंगणापूर,मढी बु.,मनेगाव,काकडी -मल्हारवाडी,बहादरपुर आदींचा समावेश आहे. पुरुषांसाठी सुरेगाव,वारी,घोयेगाव,खोपडी,बहादराबाद,राजंणगाव देशमुख,जवळके,शहापूर आदींचा समावेश आहे. या शिवाय नागरीकांचा मागास प्रवर्ग यासाठी २० जागा राखीव असून त्यात ५० टक्के महिला १० तर ५० टक्के पुरुष १० असे प्रमाण ठरवले आहे.त्यात प्रथम महिला असलेल्या गावांची नावे कारवाडी,सोनारी,वडगाव, गोधेगावं,बोलकी,दहिगाव बोलका, धारणगाव, कान्हेगाव, डाऊच बु.जेऊर कुंभारी आदींचा समावेश आहे तर नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष चासनळी,ओगदी,ऐसगाव, तीलवण, उक्कडगाव, कोकमठाण,माहेगाव देशमुख, मढी खु., देर्डे कोऱ्हाळे, पोहेगाव आदींचा समावेश आहे. तालुक्यात सर्वसाधारण सरपंच पदाच्या एकूण २९ जागा असून यात १५ महिला तर १४ पुरुष आहेत. त्यात महिला आरक्षण -मायगाव देवी, मळेगांव ठडी, रवंदे, मंजूर, हांडेवाडी, सांगवी भुसार, ब्राम्हणगाव, करंजी बु., टाकळी, कासली, लौकी, हिंगणी, देर्डे चांदवड, चांदेकसारे, धोंडेवाडी आदींचा समावेश आहे. यात पुढे सर्वसाधारण पुरुष सरपंच दर्शवले आहे - मोर्वीस, धामोरी, बक्तरपुर, वेळापूर, शिरसगाव-सावळगाव, संवत्सर, सडे,कुंभारी, शहाजापुर, चांडगव्हाण, जेऊर-पाटोदा, डाऊच खुर्द, अंजनापुर, वेस - सोयगाव आदींचा समावेश आहे.






# सुटे पैसे उपलब्ध करा; श्रीरामपूर मर्चंटची मागणी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर शहर व तालुक्यात सध्या चिल्लर पैशाचा मोठ्या प्रमाणात तुटवडा दिसून येत आहे. बाजारात चिल्लर पैसे उपलब्ध करून देण्याबाबत श्रीरामपूर मर्चंट असोसिएशनच्या वतीने स्टेट बँक ऑफ इंडिया व्यवस्थापकांना असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, उपाध्यक्ष निलेश बोरावके, ऑनररी सेक्रेटरी संदिप अग्रवाल, जॉईंट सेक्रेटरी योगेश ओझा यांच्या सह्यांचे निवेदन देण्यात आले. मार्केटमध्ये छोटे हातावर व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठ्या अडचणीला तोंड द्यावे लागत असून दैनंदिन व्यवहारात देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात होत असताना चिल्लर पैशांचा मोठा तुटवडा जाणवत आहे. याचा सामान्य माणसाला व्यवहारात त्रास होत आहे. बँकांनी याकडे लक्ष देवून चिल्लर पैसे उपलब्ध करावेत, अशी मागणी करण्यात आले. यावेळी योगेश ओझा, मनोज झंवर, सतीश व्यास, संतोष परदेशी उपस्थित होते.

# मिल्लतनगर फातेमा हाउसिंग सोसायटीत कमी दाबाने वीजपुरवठा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

शहरातील मिल्लतनगर फातेमा हाउसिंग सोसायटीत कमी दाबाने होणाऱ्या वीज पुरवठा यामुळे नागरीक त्रस्त झाले आहेत. यात सुधारणा न झाल्यास लोकशाही मार्गाचा अवलंब करावा लागेल असा इशारा फर्स्ट ह्यूमन राइटस् फाउंडेश चे अध्यक्ष जाहेद शेख, इब्राहिम सैय्यद, अकबर शाह, हुजेब शेख, जावेद पठाण, मंसूर शेख, इसाक शेख यांनी दिला. याबाबत आ. हेमंत ओगले यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी करत ते म्हणाले, परिसरामधील नागरीक व व्यावसायिकांना महावितरणकडून होणारा विद्युत पुरवठा हा पूर्ण दाबाने होत नाही. जादा दाबाचे ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत महावितरणकडे मागणी करूनही महावितरणने दुर्लक्ष केल्यामुळे नागरीकांमध्ये तीव' नाराजी आहे. पूर्ण दाबाने वीज पुरवठा होत नसल्यामुळे घरातील पंखे, फ्रीज टीव्ही, कुलर हे चालत नाही. अधून-मधून विज पुरवठा कमी जादा झाल्यामुळे फ्रीज, टीव्ही बंद पडल्याच्याही घटना घडल्या आहेत. ऐन उन्हाळ्याचे दिवस पंखे, कुलर चालत नसल्यामुळे उकाड्याचे त्रासास नागरीकांना सामोरे जावे लागत आहे. आ. हेमंत ओगले यांनी या मागणीकडे तातडीने लक्ष द्यावे तसेच तक्रारीचे निराकरण करावे अशी ही मागणी या कार्यकर्त्यांनी केली आहे. महावितरणने १५ दिवसात नव्याने जादा क्षमतेचा ट्रान्सफार्मर बसविणेची कारवाई केली नाही तर परिसरातील नागरीक महावितरण कार्यालयासमोर केव्हाही आंदोलनास बसतील असा इशारा ही जाहेद शेख सह नवीद बागबान, शाहेद बागवान, नजीर भाई शेख (टेम्पो वाले), साजिद शेख, मजीद खान पठाण, आसिफ दारूवाला, अन्वर तांबोळी, रमजान शाह, इकबाल काकर, नीहाल पटेल, इमरान पोपटिया, अनिस कुरेशी यांनी दिला आहे.

# पहलगामची घटना आणि अस्वस्थ विखे पाटील

**अहमदनगर । विनायक देशमुख**



ना. राधाकृष्ण विखे पा. यांना मी मागील ३५/४० वर्षांपासून ओळखतो. अनेक वर्षे त्यांच्यासोबत काम करण्याची, तासनतास त्यांच्या बरोबर प्रवास करण्याची, गप्पा मारण्याची संधी मला अनेक वेळा मिळाली. लोकसभा निवडणुकीपासून तर ना.विखे पा. अहिल्यानगरला आले की बहुतांश वेळा मी त्यांच्या सोबतच असायचो. आजही अकोळनेर येथील कार्यक्रमासाठी ते येणार असल्याचे समजले आणि मी त्यांच्या स्वागतासाठी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पा.फाउंडेशनच्या हेलीपॅडवर पोहचलो. साहेब हेलिकॉप्टरमधून उतरले आणि मी त्यांच्याशी हस्तांदोलन केले. नेहमी हसतमुख आणि दिलखुलास असणारे साहेब आज काहीशा वेगळ्याच मूडमध्ये असल्याचे जाणवले. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच्या हस्याऐवजी एक प्रकारची खिन्नता दिसत होती. मी मनात विचार केला की आज नेमके काय झाले असावे ? आणि याच विचारात पुढील प्रवास सुरू झाला. साहेब बोलायला लागले,

''काल पहलगाम येथे घडलेली घटना ही फारच दुर्दैवी आहे. त्या घटनेचा विचार करून मन अस्वस्थ होते. निष्पाप नागरिकांची हत्या आपल्या सर्वांसाठी अत्यंत लाजिरवाणी घटना आहे.'' त्यांच्या शब्दात खिन्नता आणि संताप जाणवत होता. गप्पा सुरू असतानाच आम्ही अकोळनेर येथे पोहोचलो. त्या ठिकाणी जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी सदेह वैकुंठ गमन सोहळ्याच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार होती. तिथेही साहेब भाषणाला उभे राहिले आणि त्यांच्या शब्दाशब्दातून कालच्या पहलगाम येथील दुर्दैवी घटनेचा संताप व्यक्त होत होता. ''कालची घटना म्हणजे समस्त हिंदूवर केलेला विकृत हल्ला आहे. अशा प्रवृत्ती विरुद्ध आणि हिंदू धर्म रक्षणासाठी आपण एक होणार की नाही ?'' असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित जनसमुदायाला विचारला . आणि क्षणात हजारो उपस्थितांनी आपले दोन्ही हात वर करून विखे पाटलांच्या प्रश्नाला सकारात्मक उत्तर दिले. २०/२५ हजारांचा जनसमुदाय, अत्यंत शांततेत आपले दोन्ही हात वर करून विखे पाटलांच्या आवाहनाला समर्थनच देत होता. विखे पाटलांचे शब्द तिथे उपस्थित प्रत्येकाच्या हृदयापर्यंत पोहोचले होते, त्यामुळेच उपस्थितांनी उस्फूर्त प्रतिसाद देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. परतीच्या प्रवासातही विखे पा. त्याच विषयावर बोलत होते. ''सर्वसाधारण राजकारणी लोक हे असंवेदनशील आणि कठोर असतात'' असा आपल्या सर्वांचा एक (गैर) समज असतो. मात्र पहलगामच्या घटनेनंतर मी अनुभवलेले विखे पाटील आणि त्यांच्या सोबत केलेल्या प्रवासातून त्यांच्यामध्ये दडलेल्या एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंची ओळख मला होत होती. शेवटी मनात विचार आला, ''खरंच आपण कालच्या घटनेतून काही शिकणार आहोत की नाही ?''

# शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ तातडीने मिळावा- फटांगडे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

मागील २०२३-२४ या वर्षातील पिक विम्याचा लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने जमा करण्यात यावा, तसेच केवळ एक रुपया भरून शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडे मागणी केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मागील वर्षीचा पिक विमा अद्यापही मिळालेला नाही. या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून वारंवार निवेदने दिली गेली, तरीदेखील प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. फटांगडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सध्या अत्यंत बिकट आहे. नैसर्गिक आपत्ती आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांवर एकामागोमाग एक संकटे येत आहेत. अशा वेळी सरकारने सुरू केलेली ''एक रुपयात पिक विमा योजना'' त्वरित लागू करणे गरजेचे आहे. जर लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम जमा झाली नाही, तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्ह्यात कोणताही शासकीय कार्यक्रम होऊ दिला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. या मागणीमुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले गेले असून, आगामी काळात कृषी विभाग यावर काय भूमिका घेतो, याकडे स्वाभिमानी संघटनेचे लक्ष लागले असल्याचे फटांगडे यांनी सांगितले. याप्रसंगी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पक्ष जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रेय फुंदे, तालुकाध्यक्ष मेजर अशोक भोसले, प्रशांत भराट, अमोल देवढे, मच्छिंद्र आर्ले, दादासाहेब पाचरणे, नानासाहेब कातकडे, हरिभाऊ कबड्डी, विकास साबळे, नारायण पायगण, मच्छिंद्र डाके, अंबादास भागवत यांच्या या निवेदनावर सह्या आहेत



# ५८ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत

**जामखेड । रिजवान शेख**

तालुक्यातील सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता आरक्षण सोडत २३ एप्रिल २०२५ रोजी काढण्यात आली. जामखेड तहसीलच्या सभागृहात सकाळी तहसीलदार गणेश माळी , निवडणूक नायब तहसीलदार संजय काळे, निवासी नायब तहसीलदार मच्छिंद्र पाडळे तसेच सचिन आगे महसूल सहाय्यक व नंदकुमार गव्हाणे मंडळ अधिकारी नायगाव यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. ग्रामपंचायत निवडणुकीला स्थानिक पातळीवर महत्त्व असल्याने सन २०२५ ते २०३० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूका लक्षात घेता अहिल्यानगर जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता हे आरक्षण सोडत काढण्यात आले. गाव पातळीवरील ग्रामपंचायत सरपंच पद हे अतिशय महत्त्वाचे असल्याने या आरक्षण सोडतीकडे जामखेड तालुक्यातील गाव पातळीवरील राजकारण्यांचे लक्ष लागलागले होते. जामखेड तालुका सन २०२५ ते ३० करिता ग्रामपंचायतनुसार सरपंच पदाचे आरक्षण यामध्ये अनुसूचित जाती (एस.सी) मधे शिरूर, दिघोळ, पाटोदा, साकत, जातेगाव, अनुसूचित जमाती (एस. टी) पिंपरखेड तसेच नागरिकांचा मागास प्रवर्गमधे (ओ.बी.सी)साठी आरणगांव,सातेफळ, झिक्री, आनंदवाडी, बोर्ले, जवळा, धनेगाव, वाकी, सारोळा, कवडगांव, पिंपळगाव अळवा, मतेवाडी, तेलंगशी, पाडळी, डोणगांव, देवदैठण हे गावे समाविष्ट आहेत.

तहसीलच्या सभागृहात शौर्य गणेश मासाळ वय वर्ष १० या मुलाच्या चिठ्ठीद्वारे हे आरक्षण काढण्यात आले. यावेळी तालुक्यातील तसेच गाव पातळीवरील राजकारणी मंडळी उपस्थित होती. जामखेड तालुक्यातील ५८ ग्रामपंचायत पैकी सरपंच पदासाठी २३ ग्रामपंचायती आरक्षित ठरल्या त्यापैकी ३५ सर्वसाधारण आहेत. सर्वसाधारण प्रवर्गामधे मोहरी ,चोंडी, आघी,घोडेगाव पिंपळगाव उंडा, नायगाव, खुरदैठण, नान्नज, सोनेगाव, फक्राबाद जवळके, धोंडपारगाव, मोहा, हळगाव, बांदखडक, राजुरी नाहुली, धामणगाव, धानोरा, खर्डा रत्नापूर, सावरगाव, खांडवी बाळगव्हाण, आपटी, तरडगाव कुसडगाव, राजेवाडी, चोभेवाडी गुरेवाडी, जायभायवाडी, मुंजेवाडी, पोतेवाडी, बावी, लोणी, ही गावे सर्वसाधारण प्रवर्गात आहेत. या सरपंच पदाच्या आरक्षणानंतर ग्रामीण भागातील राजकीय चर्चांना वेग आले आहे.

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा